# सावरकर गौरव गान

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९९

★

कवयित्री

**सौ. मंगला कृ. पेठे**

★

REFBK-0024105
REFBK-0024105

किंमत रु. २-५०

# सावरकर गौरव गान

★

कवयित्री

सौ. मंगला कृ. पेठे

१३, 'आनंदाश्रम', नौपाडा, ठाणे.

ग्रंथालय ठाणे
२४९९
काव्य २४१०५
२४११८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## -: स्वरांजलीतर्फे

REFBK-0024105
REFBK-0024105

★

संयोजिका

सौ. चारुशिला दिवेकर — M A. संगीत प्रवीण

सौ. शैलजा साठे — संगीत

★

पेटीची साथ — सौ. दिवेकर

व्हायोलीन वादक — श्री. बाडकर

★

तबला वादक

श्री. आंबीकर, साहाय्यक कुमार चितळे

★

गायिका

सौ. भावे — M. A. With संगीत

सौ. भागवत — M. A. With संगीत

सौ. मराठे

सौ. सोमण

सौ. दिक्षीत

सौ. फडके

मुद्रक :
**श्री. गो. धों. फडके**
अरुणोदय छापखाना,
' कुलदीपक ', सुभाष पथ,
ठाणे – ४०० ६०१.
दूरध्वनी : ५९ १६ ७६

**कै. दत्तात्रेय वेंकटेश केतकर**
**कै. आनंदीबाई दत्तात्रेय केतकर**
माता पित्यांच्या चरणी सादर अर्पण

बहरलेले जीवन पितया

माय तात हे अभिमान वर्णुया

उरी दाटली प्रीति माया

शिल्पकार तू शिल्प घडविले

घड्यात मातीच्या अमृत पडले

संस्काराचे बीज पेरले

आज पुनः का बहरून आले

बीज एकले ते अंकुरले

रोप वाढले फुलले फळले

जीवनातला अर्थ उमगले

जुळली नाती माती मिसळुनी सर्वही जाती

कवयित्री – **सौ. मंगला कृ. पेठे**

# अ नु क्र म णि का


| गीत क्र. | गीताचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | अन्याया वाचा ती फुटली ( पोवाडा ) | १ |
| २. | गेली निघून आई | ३ |
| ३. | असा हा अष्टभूजेचा थाट | ५ |
| ४. | यावत् चंद्र, सूर्य तोवरी भाग १ ला ( भारतातील कार्य ) | ६ |
| ५. | यावत् चंद्र, सूर्य तोवरी भाग २ रा ( लंडनमधील कार्य ) | ७ |
| ६. | भेट | ९ |
| ७. | मनाचे बंड | १० |
| ८. | स्वर्गीचा हा कल्पवृक्ष | ११ |
| ९. | हृदय सागरा | १३ |
| १०. | पथ हा काटेरी | १४ |
| ११. | बोला जयजयकार वीरांचा ( समारोप ) | १६ |

सौ. मंगला पेठे यांची स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या गौरवार्थ लिहिलेली गीतमालिका मनःपूर्वक वाचली. त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद वाटला. त्यांना या स्तुत्य प्रयत्नाबद्दल, वडिलकीच्या नात्याने शुभाशीर्वाद देत आहे.

— पी. सावळाराम

क्रांतीकारकांचे महामेरू, जाज्वल्य देशाभिमान रोमरोमात भिनलेले महान देशभक्त, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सर्वस्वाचा होम करण्यास केवळ सिद्धच नव्हे तर त्याचे प्रत्यक्षपाठ हसत हसत, निर्भयपणे, दुर्दम्य आशावादाने इतरांना देणारे, महाकवीची प्रतिभा आणि ती साकार करण्यासाठी लागणारे अभिव्यक्तीचे सामर्थ्य लाभलेले स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनाने व जीवित कार्याने अनेकांना अनेक प्रकारे स्फूर्ती दिली. असंख्य साहित्यिकांच्या, कवींच्या प्रतिभेला बहर आला. या महान व्यक्तीच्या जन्मशताब्दीच्या वर्षात तिच्या अलौकिक व्यक्ती-मत्वाच्या पुण्यस्मरणाने लहान-थोर कवींच्या लेखण्या त्यांचे गुणगान करण्यास सरसावल्या. त्यापैकी एक कवयित्री सौ. मंगला पेठे.

सौ. पेठे यांच्या काव्यगुणांचा प्रत्यय रसिकांस यापूर्वी आलेला आहे. या विशेष वर्षी मृत्युंजय वीर सावरकर यांना स्वरांजली वाहण्याची उत्कंठा त्यांना लागावी हे उचितच. वीर सावरकर यांच्या व्यक्तित्वाच्या मोजक्याच पैलूंचे दर्शन त्यांनी स्वरांजलीतुन प्रकट केले आहे. ही प्रकट करण्याची ओढ त्यांच्या या छोटेखानी प्रयत्नातून दिसून येते. याच निमित्ताने चाफेकर बंधु, वासुदेव बळवंत, भगतसिंह इ., या ज्या सामान्यांच्या स्मृतीपटलाआड जाणाऱ्या व्यक्ती, त्यांच्या पवित्र स्मृतीला उजाळा देण्याचाही प्रयत्न कवयित्रीने केला आहे या व अशा अनेक देशभक्तांच्या समरयज्ञाने कवयित्रीला भारावून टाकल्याचे या काव्यपंक्ती व्यक्त करतात. 'गेली निघून आई', 'भेट', 'स्वर्गाचा कल्पवृक्ष', 'पथ हा काटेरी' या गीतांतील आर्तता रसिकांस खचित जाणवेल. घाईत राहून गेलेले जे किरकोळ दोष वाचताना भासतात ते गीतश्रवणात जाणवणार नाहीत असे वाटते.

सौ. पेठे यांचा प्रयत्न रसिकांस आनंद देवो व त्यांच्याकडून 'स्वरांजली'चे स्वागत होवो ही इच्छा !

— स. वि. कुलकर्णी

ठाण्यातील एक उदयोन्मुख कवयित्री सौ. मंगलाबाई पेंडे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जन्मशताब्दीने प्रभावित होऊन सावरकरांच्या जीवनातील निवडक प्रसंगांवर कविता रचून त्यांचा छोटासा पुष्पगुच्छ रसिकांसमोर ठेवलेला आहे. आधीच स्वातंत्र्यवीर सावरकरांचे व्यक्तिगत जीवन व क्रांतिकार्य सर्व-सामान्य भारतीयांना स्फूर्तीस्पद वाटणारे आहेच, आणि त्यातही या पुष्पगुच्छा-तील अकरा कविता म्हणजे रसिकांना काव्यएकादशीच वाटेल. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची पार्श्वभूमी सावरकरांचे स्फूर्तिस्थान ठरलेले आहे म्हणून कवयित्रीने प्रारंभीच १८५७ च्या क्रांतियुद्धाचा पोवाडा रचला आहे.

बॅरिस्टर सावरकरांची आई त्यांच्या बालपणीच निवर्तली. याचे दुःख 'गेली निघून आई' या करुणरसपूर्ण गीतात आहे. छत्रपती शिवाजीराजांना जिजामातेचा वरदहस्त प्रौढपणापर्यंत लाभला पण सावरकर त्या बाबतीत अभागीच ठरले. हा संदर्भही मार्मिक आहे. छत्रपतींना जशी तुळजापूरची भवानी वरदायिनी वाटली तशीच सावरकरांना नाशिकची अष्टभुजा देवी वंदनीय वाटली. हे साम्यही कवयित्रीने समुचित शब्दांनी वर्णिले आहे. या देवतेचा आशीर्वाद घेऊनच राष्ट्रमुक्तीची प्रतिज्ञा सावरकरांनी घेतली. ही क्रांतीच्या 'वळणावरची वाट' सदोदित समोर ठेवण्यासाठी नाशिकचे कवी गोविंद व साहसी तरुण म्हणून नामा शिंपी, अनंत कान्हेरे, वर्तक, महाबळ आणि स्वतःचे दोन्ही बंधु ही क्रांतीकारक मित्रमंडळी गोळा केली. पुढे सावरकर इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी गेले, मॅझिनीच्या चरित्राने भारावले व त्याचे चरित्रही त्यांनी लिहून काढले. क्रांतिकारकांना मार्गदर्शन केले व साधने पुरविली. इंग्लंडहून परतण्यापूर्वीच त्यांना अटक झाली व मुंबईत आणून, खटला भरून, त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. अंदमानला प्रयाण करण्यापूर्वी सावरकरांनी पत्नीचा धीरोदात्त शब्दांनी घेतलेला निरोप कवयित्रीने अर्थपूर्ण शब्दात वर्णन केला आहे –

'वियोगावरी मात करूनी तू । सार्थ करी बलिदान ॥
चूल बोळकी मोडून सारी । संसारी ना रममाण ॥'

अंदमानच्या तुरुंगवासात शारीरिक व मानसिक छळावर विवेकाने केलेली मात जशी सावरकरांचा ध्येयगंभीर स्वभाव प्रकट करते, तशीच त्यांच्या येसू-

वहिनीचे निधन झाल्याचे कळताच सावरकरांच्या कोमल करुण मनाचा वेध घेणारी कवयित्रीची शब्दकला पुढील चरणांतून प्रत्ययास येते —

‘स्वर्गीचा हा कल्पवृक्ष कुणी, मम दारी लाविला ।
वाण सतीचे घेई वहिनी । अहेवपणी हे मरण येऊनी ।
सार्थक होई वीर रमणी । तत्त्ववेत्ती, जीवन उजळी, समिधा हो निश्चला ।
माझी वहिनी माय माऊली । उणीव नाही जीवनी पडली ।’

अशी ही वहिनी दिवंगत होताच सावरकरांना ‘भकास मन हे, भयाण जीवन, प्रकाश काळोखला ॥’ असे वाटल्यास नवल नाही.

‘हृदयसागर’ या कवितेतून सावरकरांच्या अनेक लोकोत्तर गुणांचे स्तवन आढळते. ‘उदात्त दिव्य ते दाहक व्रत’ घेणारे, ‘अस्पृश्यांना सामावून’ घेणारे, ‘वक्तृत्वाच्या अमोघ लहरी’ उचंबळून सोडणारे सावरकर येथे उभे राहतात. पुष्कळदा थोरांच्या गुणवर्णनाच्या वेळी त्यांना साथ देणारी त्यागशील सहधर्मचारिणी दुर्लक्षित होते पण सौ. मंगलाबाईंनी स्त्री-धर्मास जागून माईंकडे आपल्या प्रतिभेचा मोर्चा वळवला आहे. ‘पतिव्रते तव पथ हा काटेरी’ या कवितेतून हे समर्थपणे वर्णिले आहे.

समारोपपर कवनातून ‘या वीरांचा बोला जयजयकार’ ही घोषणा देत कवियित्री म्हणते, ‘अहा, क्रांतीवीर महान । धन्य असे बलिदान ॥’

सावरकरांवरील या काव्यगुच्छात ओज, नादमाधुर्य आणि अर्थगर्भता आहे. क्वचित प्रसंगी शब्दांची ओढाताण, क्वचित ठिकाणी वृत्तदोष आढळतात. तथापि हे दोष वजा करूनही कवनांचा रसाळ ओघ पुढे सरकतो आणि यातच कवियित्रीचे यश आहे.

१ जानेवारी १९८४ (प्रा.) म. वि. फाटक

अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखा.

# लेखिकेचे मनोगत

समग्र सावरकरविषयक पुस्तकांच्या अध्ययनाने त्यांच्या विशाल व्यक्तिमत्वाचा ठसा माझ्या मनावर उमटला. केवढे अगाध व्यक्तिमत्व ! प्रचंड वादळी राष्ट्रकार्य, अचाट साहस, प्रचंड बुद्धीसामर्थ्य, अमोघ वाणी व जाज्वल्य राष्ट्रप्रेम पाहून माझे हृदय उचंबळून आले, इतकेच नव्हे तर त्यांच्याबद्दलचा आदरभाव द्विगुणीत होऊन मन भारावून गेले. कृतज्ञ भारत-वासियांनी त्यांच्या चरणांशी नतमस्तक व्हावे असेच त्यांचे थोर जीवन-चरित्र आहे. विनायक दामोदर सावरकर हे एक ईश्वरी अंशाच होय - केवळ देह धारण केलेले.

मृत्युंजय वीर सावरकर खरोखरंच अमर झाले. ते एक कर्ते युगपुरुष होय. त्यांचे ते खडतर व्रत, निस्वार्थी जीवन, सशस्त्र क्रांती, निर्भय वृत्ती, भारत कदापिही विसरणार नाही. त्यांची ती अथांग ध्येयनिष्ठा मृत्युशी झुंज, संयमी, त्यागी, विवेकी, वृत्ती पाहून मला वाटले सावरकर अक्षरशः गीताच जगले. सामान्यांप्रमाणे 'एकतरी ओवी आचरावी' असे नव्हे तर त्यांचे सर्व जीवन गीतामय झाले होते. सर्वगुणसंपन्न सावरकर अत्यंत हृदयशील होते.

या क्रांतीवीराने आद्य क्रांतीवीर चाफेकरांच्यावर पोवाडा लिहिला. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन स्वतःस यज्ञात झोकून दिले. जीवन समर्पित केले. जाणिजे यज्ञकर्म ! अशा क्रांतीवीरावर – विनायक दामोदर सावरकरांवर – आपणही पोवाडा लिहावा अशी अंतःप्रेरणा मिळाली अन् मी पोवाडा लिहिण्याचे ठरविले. 'अन्याया वाचा फुटली' ओळ आठवली. पण त्यांच्यावर पोवाडा लिहिण्याचं साहस मला होईना. परंतु मन ऐकेना. त्यांच्यावर पोवाडा लिहिण्यास माझे सामर्थ्य कमी पडेल याची जाणीव असताही माझे मन पोवाडा लिहिण्यास उद्युक्त झाले. हळूहळू मला त्यांच्या जीवनपटातील निवडक प्रसंगांवर चित्रणात्मक गीतरचना करण्याचा मोह अनावर झाला. मला सावरकर जसे भावले तसे मी ११ गीतांतून यथामती व्यक्त केले. यथामती लिहिलेली ही गीतमालिका – बोबडे बोल – कौतुकाने रसिक गोड मानून घेतील अशी खात्री आहे.

या स्वरांजली मंडळातील सौ. शैला साठे व सौ. चारुशिला दिवेकर या दोघी संयोजिकांनी गीतांना चाली दिल्या. माझ्या भावरूपी शब्दांना सूर दिले, भरघोस सहकार्य दिले. मी त्यांची अंत्यत आभारी आहे. तसेच इतर गायिका, तबलजी श्री. आंब्रीकर, व्हायोलिन वादक श्री. वाडकर यांच्या सक्रीय मदतीनेच मी गीतांचा कार्यक्रम रसिकांपर्यंत पोहचवू शकले.

पहिला मुहूर्त ( कार्यक्रमाचा ) गणपतीपुढे व्हावा या सदीच्छेने मी भारावले. ही माझी

सदीच्छा श्री. फाटक व सौ. फाटक यांनी आपल्या घरच्या गणपतीपुढे कार्यक्रम सादर करण्याचे निमंत्रण देऊन पुरी केली. त्यांची मी आभारी आहे.

मो. ह. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. स. वि. कुलकर्णी यांनी माझी गीते वाचून मोठ्या कौतुकाने अभिप्राय दिला. प्रख्यात विद्वान कवी श्री. पी सावळाराम यांनी गीतांचे मनःपूर्वक वाचन करून कौतुक केले व शुभाशीर्वाद दिले. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. म. वि. फाटक यांनी माझ्या गीतांचे मनःपूर्वक कौतुक केले. अभिप्राय व्यक्त केला. सन्मित्रचे संपादक श्री. स. पां. जोशी यांनी वेळोवेळी आपल्या दैनिकातून प्रोत्साहन दिल्यामुळे मी त्यांचे आभार मानते. तसेच अरुणोदय छापखान्याचे मालक श्री. गो. धों. फडके व त्यांचे सर्व सहकारी यांनी पुस्तिकेची छपाई वेळेवर करून दिली. या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

कृतज्ञ,

कवयित्री **सौ. मंगला कृ. पेठे**

## मृत्युंजय स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दीनिमित्त स्वरांजली सादर करीत आहे –

# ' सावरकर गौरव गान '

### गीत रचना – सौ. मंगला कृ. पेठे

सावरकरांचं हे जन्मशताब्दीचं वर्ष साजरं होत आहे. त्यानिमित्ताने यथामती आम्ही त्यांचे गुणगान करीत आहोत. सावरकर एक महाकवी, अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभलेले, राष्ट्राकरिता समर्पणाची वृत्ती धारण करणारे, स्वातंत्र्यासाठी झटणारे, त्याचबरोबर समाजचिंतन व हिंदु संघटनेचा आग्रह धरणारे होते. प्रखर बुद्धिवादी आणि विज्ञाननिष्ठ होते. अशा थोर विभूतीचे व्यक्तिमत्व भारताला भूषणावह आहे. चला तर ऐका आता त्यांच्या पराक्रमाचा पोवाडा – ' अन्याया वाचा ती फुटली '.

### अन्याया वाचा ती फुटली – पोवाडा

अठराशे सत्तावन साली । पेटली रणभूमी
क्रांती ती घडली, क्रांती ती घडली, भारतात ।
अन्याया वाचा ती फुटली – अन्याया वाचा ती,
फुटली हो जी जी जी जी ॥ धृ ॥

रक्ताचे पाट वाहिले । " हाणा मारा " नाद निनादले
स्फुरण ते चढले । वीर ते लढले, वीर ते लढले,
भारतात । अन्याया वाचा ती फुटली हो जी जी ॥ १ ॥

स्फूर्ती घेई तो बलवंत । वासुदेव रणी झुंझत
बंधू ते चाफेकर तीन । करीती ते रँडचा खून
क्रांतीची ज्योत पेटत । आव्हान मृत्यूसि देत
हुतात्मा अवतरत । जन सारे हो भयभीत
अन्याया वाचा ती फुटली हो जी जी जी जी ॥ २ ॥

ज्वाळा ती जीवन यज्ञाची । भीडती आभाळा,
भीडती आभाळा । विनायक स्वये होई समीधा,
विनायक स्वये होई समीधा हो जी जी ॥
अन्याया वाचा ती फुटली हो जी जी ॥ ३ ॥

मृत्यूस ते जिंकून । सोडविण्या जाती धावून
ते अगाध राष्ट्रप्रेम । माय माऊलीस पुजून
चित्तात ते समाधान । ध्येयात गुंतले मन
समर्पूनी स्वये जीवन । यज्ञात दिले झोकून,
यज्ञात दिले झोकून । जी जी जी जी
अन्याया वाचा ती फुटली हो जी जी ॥ ४ ॥

ध्येयावर दृष्टी ठेवून । महासागरास तरून
यातना सोशी दारुण । तळमळे कोलू फिरवून
क्षणोक्षणी विराट हो मन । कार्यात सदा हे लीन
शत्रूस मागे फिरवून । पाही स्वातंत्र्य डोळा भरून
शत्रूने केला पोबारा, शत्रूने केला पोबारा ।
गाथा हो गुंडाळून,
गाथा हो जाई गुंडाळून जी जी ॥ ५ ॥

धन्य ते धन्य क्रांतीवीर । धन्य ते भगूर, धन्य ते भगूर
धन्य अवतार इथे घडला । गौरवे मान इथे झुकणार
अमर ही गाथा इथे गाणार, अमर ही गाथा इथे गाणार जी जी
गौरवे करीन जयजयकार जी जी ॥ ६ ॥

खरोखरंच, सावरकरांचे कार्य अगाध होतं —

अशा थोर सावरकरांची आई बालपणीच त्यांना सोडून निघून गेली आणि त्यांचे मन मात्र आईकडे वेगाने धावू लागले. ‘आता मी शिवाजी कसा होऊ ?’ असे त्यांना सारखे वाटू लागले. आईच्या पवित्र स्मृतीमागे मन स्वच्छंद विहरू लागले. त्यांना कटीवर घागर घेऊन दारणेवर पाणी आणणारी आईची मूर्ति दिसू लागली. चिंचेच्या झाडाच्या सावलीत विसावा घेत असताना भीम्या महार धावत आला. “तहान लागली आहे. तात्या, मला पाणी दे”, असे म्हणताच आईने घागरीने त्याच्या ओंजळीत पाणी ओतले अन् भीम्या तृप्त झाला. आई परत नदी-

कडे जाण्यास निघाली अन् सावरकरांना म्हणाली, "हे बघ, भुकेलेल्यास अन्न अन् तहानलेल्यास पाणी दिलं तर देव आपणास अन्नपाणी भरपूर देतो बरं!" मग सावरकरांना असे वाटले – सर्वभूती एकच परमेश्वर आहे हे आत्म्याचे तत्त्वज्ञान मला त्यावेळी फारसे कळले नाही, आता मात्र त्या तत्त्वज्ञानाची महती मला कळत आहे. त्यांची आई थोर अंतःकरणाची होती. पहाटे भूपाळी म्हणत असे. जात्यावर दळताना ओव्या म्हणे. नंतर सडासंमार्जन करून वृंदावनापाशी रांगोळी काढी. अशी सुंदर मूर्ति ते पाहू लागले. आणि त्यांना लहानपणी घडलेल्या प्रसंगाची आठवण झाली – एकदा त्यांच्या घरी चोरी झाली. हरवलेला कुंकवाचा करंडा बागेच्या कुंपणाजवळ मिळाला. आण्णा तो करंडा पाहून धाय मोकलून रडले अन् म्हणाले, "बाळांनो, तुमच्या आईचा हा करंडा आहे. चोरी झाली तरी सौभाग्य घरातच राहिले." असे म्हणून त्यांनी आम्हा भावंडांना त्यातील कुंकू लावले. कपाळावर कुंकवाचा टिळा लाविल्याबरोबर सावरकर मनोमन हरखून गेले. देवीस विनवू लागले की, माझी आई मला परत दे. ऐका हे गीत – 'गेली निघून आई, माझी कुठे जिजाई'.

## गेली निघून आई

गेली निघून आई, माझी कुठे जिजाई ?
हाकेस ओ न आली, परतून ये ग आई
होऊ कसा शिवाजी ॥ धृ ॥

भिर भिर हिंडलो गे, आईस शोधिण्याही
वृंदावनासी जाता, तो श्लोक येई कानी
तुळशीपुढे आता गे, लाविल कोण वात
देवीस आळविता, तूज पाही मूर्तिमंत ॥ १ ॥

ते वृक्ष सळसळूनी, गाळीत साज आज
त्या गाय वासरांचे, अश्रू टिपील कोण ?
झाल्याच ओस वाटा, परसात भास होई
रूपात विलीन व्हावे, प्रेमस्वरूप आई ॥ २ ॥

शिवबास पूज्य मानी, स्वप्नात पाही किल्ला
दास्यात देश आहे, लागे स्वातंत्र्य कार्या
गवसे तिचा करंडा, बळ आज ते मिळाले
ते राज्य मिळविण्या गे, रक्तात न्हाऊ घाली

वरदायी मूर्ति पाही, समया समोर दिपल्या
कुंकूम तिलक लागे, माझ्याच रे कपाळी ॥ ३ ॥
वाटे तुलाच आई, तव पुत्र हो शिवाजी
परतून ये ग आई, माझी कुठे जिजाई ॥ ४ ॥

सावरकरांना मनात पक्के समजले की आई आता कधीही येणार नाही. १८ एप्रिल १८९८ साली चाफेकर बंधूंना फाशी दिली, ते वाचून सावरकर अक्षरशः रडले. चाफेकरांसारखे काही तरी करावे अशा विचाराने ते भारावले. गाभाऱ्यात वेदघोषांचा पडसाद उमटावा त्याप्रमाणे काव्यपंक्तींचा पडसाद अंतःकरणात उठला. चोहीकडे पोवाडे गाईले जाऊ लागले.

सावरकरांना मात्र अहोरात्र फाशीचा खांब दिसू लागला. दामोदर चाफेकर खुणावित होते की 'तुही याच मार्गाने ये', असा स्पष्ट भास त्यांना झाला. पुढे नवरात्रात त्यांच्या घरी अष्टभूजेची स्थापना झाली. त्या देवीची ते आराधना करू लागले. कारण दुर्बलांना सबल करणारी ती महिषासूरमर्दिनी होती. सावरकर तिच्याकडे टक लावून पाहू लागले असतानाच ते ध्यानमग्न झाले. ते देवीस म्हणाले, "देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत मारीत चाफेकरांसारखा मरेन, शिवाजीसारखा विजयी होऊनच मायभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा अभिषेक करीन. हे देवी, मला बळ दे." अशी त्यांनी प्रार्थना केली.

देवीच्या हातातील आयुधे तळपत होती. कुंकवाने मळवट भरला होता. सौभाग्य खुलून दिसत होते. विलक्षण तेजस्वी मूर्ति ते न्याहाळीत होते. फुलांचा दरवळ आसमंतात भरून राहिला होता.

अशी क्रांतीची ठिणगी त्यांच्या अंतःकरणात पडली. बघता बघता सहस्र सूर्याचे तेज त्यांच्या अंगावरून सरकत असल्याचा त्यांना भास झाला. हीच ती प्रतिज्ञा. ऐका तर हे गीत – 'असा हा अष्टभूजेचा थाट' ( प्रतिज्ञा ).

## असा हा अष्टभूजेचा थाट

आश्विनात ही फुलत चांदणे, दिपले ते नवरात्र
असा हा अष्टभूजेचा थाट ॥ धृ ॥

शिंगाची ललकारी घुमली
वाजत ताशे, नौबत झडली
वाजत गाजत, पालखी हलली
हर्ष दाटला, घोष निनादे झांजांच्या तालात ॥ १ ॥

सडा संमार्जनही करूनी
रांगोळ्या कीती खुबक रेखुनी
ललना साऱ्या नटुनी थटुनी
अष्टभूजा ही मिरवित आली, जन जमले दारात ॥ २ ॥

ओवाळुनी, शिरी पुष्प वाहुनी
हसत मुखाने गृही स्थापुनी
तेल तुपाचा दीप लावुनी
बांधुनी तोरण तिला बसविले, सुंदरशा मखरात ॥ ३ ॥

पद्म शंख करी त्रिशूल पाही
खड्ग गदा परशु चक्र ही
चरणी लागे ठसली मूर्ती ही
आशीष घेई बाळ विनायक, राष्ट्राच्या कार्यात ॥ ४ ॥

शिवबाला हो प्रसन्न भवानी
दे मजला दे तशी भवानी
राष्ट्राकरिता अश्रू ढाळुनी
घेई प्रतिज्ञा दिव्य व्रत ते, बळणावरची वाट ॥ ५ ॥

प्रतिज्ञा घेतल्यानंतर तिच्या पूर्ततेसाठी बाल सावरकरांची पाऊले क्रांतीच्या दिशेने वाटचाल करू लागली. शिवबांनी जसे स्वराज्य स्थापनेस्तव मावळ्यांना संघटित केले तसे सावरकरांनी आपले सवंगडी गोळा केले. राष्ट्र-प्रेमाच्या आणा-भाका, हिंदु संघटनेच्या ललकाऱ्या व शत्रु-निषेधाच्या घोषणांनी नाशिकचा परिसर दुमदुमू लागला. हा नवा शिवबा या नव्या मावळ्यांसह पुन्हा एकदा राष्ट्रोद्धारासाठी महाराष्ट्र देशी अफाट साहस करू लागला ऐका तर त्यांच्या भारतातील कार्यावर रचिलेले पद – 'असा हा सावरकर सम्राट' : भाग १ ( बालपणातील व भारतातील कार्य ).

## यावत् चंद्र, सूर्य तोवरी

### भाग १ ला ( भारतातील कार्य )

यावत् चंद्र, सूर्य तोवरी उसळे सागर लाट
असा हा सावरकर सम्राट ॥ धृ ॥

राधेचा हा पुत्र शोभतो
गोकुळ सोडुनी दूरही जातो
मथुरातही भिरभिर फिरतो
राष्ट्रभक्तीने, जीवन गंधित, भरले काठोकाठ ॥ १ ॥

शिवबा जमवी तसे मावळे
शिंपी नाम्या, आबा पांगळे
पाठीवर घे, प्रेम आगळे
रणाविना का, स्वतंत्र होई, भूमाता ही विराट ? ॥ २ ॥

सवंगड्यांसह खेळ खेळती
दारणेतही डुंबुनी न्हाती
घोडी उधळीत चालही करिती
शत्रूवरही तुटूनी पडती, साहस हेही अचाट ॥ ३ ॥

फासावरती चाफेकर ते
वीर लटकले पाहुनिया ते
अश्रू ढाळी ऊरही भरते
घेई प्रतिज्ञा, दाहक व्रत ते, वळणावरची वाट ॥ ४ ॥

मार्सेलीस बंदरात प्रवेश करताच सावरकरांचं अंतःकरण थरारलं ! मॅझिनीच्या गुप्त संस्थेचे कार्यक्षेत्र हेच सावरकरांच्या स्फूर्तीचे क्षेत्र बनले. त्यांच्या पुण्यपावन वास्तव्याने पुनीत झालेल्या वास्तुवर पाय ठेवताच, सावरकरांची पाऊले पावन झाली. त्यांनी मॅझिनीचा शोध घेतला. भारतभवन येथे १८५७ च्या बंडास पन्नास वर्षे झाली म्हणून अर्ध-शताब्दी साजरी केली. तेथे त्यांना थोर कार्यकर्ते मदनलाल धिंग्रा भेटले. ऐका तर त्यांच्या कार्याची महती – ' असा हा सावरकर सम्राट ' : भाग २ ( लंडनमधील कार्य ).

## यावत् चंद्र, सूर्य तोवरी

### भाग २ रा ( लंडनमधील कार्य )

यावत् चंद्र, सूर्य तोवरी उसळे सागर लाट
असा हा सावरकर सम्राट ॥ धृ ॥

मॅझिनीने स्फूर्तित केले
कर्णी रणगीत घुमू लागले
चरण धुलीने पावन झाले
सशस्त्र क्रांतीचे, स्वप्न पाहूनी, बांधी विनायक गाठ ॥ १ ॥

भारत भवनी कार्य करूनी
राष्ट्रप्रेमा ज्योत पेटवूनी
अर्ध शताब्दीत भाषण देऊनी
धिंग्रा जाई फासावरती, मातृप्रेम ही दाट ॥ २ ॥

सक्त नजर ती विनायकावर
कुठे रहावे, उरले ना घर
मातृभूमीची स्मृती अनावर
विनवी सागरा, परत नेण्या, अश्रू ते नयनात ॥ ३ ॥

काळाच्या त्या सीमा पाहुनी
उडी घ्यावी हेच ठरवुनी
जॅक्सनची ती वार्ता ऐकुनी
एकांतातही, कानमंत्र घे, दर्शन हो स्वप्नात ॥ ४ ॥

शतार्ध वर्षे शिक्षा झाली
हाल सोशिले बंदी म्हणुनी
स्वतंत्र राष्ट्र हे इथे पाहुनी
जयजयकारे, स्वागत केले, हार पडे कंठात ॥ ५ ॥

राष्ट्रकार्याचा वृक्ष फोफावू लागला. सावरकरांनी मार्सेलीसच्या बंदराला जाताना बोटीतून उडी घेतली. ते महासागर पोहून गेले. तेथे ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. त्यावेळेस त्यांना भारतात आणले. ५० वर्षे जन्मठेपेची शिक्षा त्यांना झाली होती. भारतात परतल्यावर त्यांची अवघी १९ वर्षांची पत्नी व मेहुणा भेटावयास गेले. त्यावेळी सावरकरांच्या मनात क्षणभर चर्र झाले, कारण आपले पती बॅरिस्टर होणार अशी स्वप्ने बघणारी त्यांची पत्नी अवाक् झाली दोघेही त्यांच्याकडे नुसते पहात होते. परिस्थितीवर येणारा ताण कमी करण्यासाठी सावरकर विनोदाने म्हणाले, " मी तोच आहे, फक्त वेष बदलला आहे ". अशा तऱ्हेने भावनेवर विवेकाने विजय मिळविला व दोघांना बोलते केले. त्यांची ती भेट म्हणजे जन्माच्या ताटातुटीच्या आधीचा हा शेवटचा निरोप होता — या जन्मात तुमची-आमची पुर्नभेट होणे जवळजवळ दुर्घट असे सांगणारी ती भेट.

वेळ संपताच भेटही संपली. कोठडीत गेल्यावर त्यांचे अवसान संपू लागले. त्यातच त्या पिलांचा आक्रोश, त्यांचे ते मातृवियोगाचे दुःख पाहून सावरकरांना विरह साहवेना. नियतीने त्यांच्याच वियोगाच्या वेदनांचे चित्र हेतुपूर्वक निवडले होते का ! हे करुण भयंकर चित्र पाहून ते धाडकन् धरणीवर कोसळले पण ते स्वतःला कसे सावरतात ते पहा त्यांच्या गीतात — भेट ( ' विनायका आज तुझा सन्मान ' ).

ग्रंथालय
२४००
२४१०५
काव्य
२५१२८

## भेट

विनायका, आज तुझा सन्मान ॥ ध्रु ॥
वियोगावरी मात करूनी तू
सार्थ करी बलिदान
विवेका हाच तुझा सन्मान ॥ १ ॥

विचार दाटले, वळीव भरले
उर दाटले, शब्द लाजले
निर्दय पहारा, अवती भवती, गजाआडची
भेट असे ही महान ॥ २ ॥

क्षणात पळवी, विवेकाबले
मनीचे सारे अभ्र विरघळे
वियोगावरी मात करूनी तू
संपवी मनीचा ताण ॥ ३ ॥

अंधारी या प्रकाश पसरी
राष्ट्राकरिता वाहूनी घेसी
चूल बोळकी मोडून सारी
संसारी ना रममाण ॥ ४ ॥

विनोदाने म्हणशी तिजला,
" वेष बदलला, म्हणूनी ना पटे,
ओळख आपुली, ओळख आपुली ",
माजत मनी हे रान ॥ ५ ॥

द्वंद्व पाहुनी विकल जाहले
धरणीवरती देह कोसळे
मायापाशी गुंतू नको रे
निश्चल हो, निश्चल हो
हाच तुझा अभिमान ॥ ६ ॥

नियतीने जरी कुभांड रचिले
व्याकुळ मनीचे चित्र रेखिले
लक्षी लक्ष्या, लक्षी लक्ष्या
देई रे अवधान ॥ ७ ॥

' वियोगावरी मात करूनी तू संपवी मनांचा ताण

विनायका आज तुझा सन्मान '

सावरकरांची विवेकशक्ति खरोखरंच अचाट होती !

अंदमानच्या भीषण कारागृहात कारावास सोसत असताना त्यांचे मन आक्रंदून उठले. यातना सोसवेनात. अंदमानात हाल-अपेष्टांना कंटाळून कित्येकांनी आत्महत्या केली होती. खोलीतील खिडकीवर लटकणारा दोर पाहून सावरकरांनाही वारंवार वाटू लागले — संपवून टाकावा आपला जीव. परंतु या प्रसंगीही मनाला त्यांनी समजाविले, " रे मना, तू गतीशील आहेस, यातनांचा भार सोसण्याचे सामर्थ्य फक्त तुझ्यातच आहे. तुं अहंकार करू नकोस, देशकार्य करणाऱ्यांना जन्मठेप, बंदिवास हा सोसावाच लागतो हेच त्यांचे भूषण आहे. हे मना, यातच तुझा गौरव आहे. व्यर्थ वल्गना करू नकोस. शांत हो. " ऐका तर आता गीत — ' मनाचे बंड ' ( ' आक्रंदीत चित्त वृथा, भोग भोगीता ' ).

## मनाचे बंड

( धवल चंद्र वृत्त )

आक्रंदित चित्त वृथा, भोग भोगिता
तुच्छ लेखी जीवन हे, कोलू फिरविता
आज होई का उदास, ध्येयी सांगता
सहसा ये दाटुनी नभ मेघ अंकिता ॥ १ ॥

उच्च ध्येय आक्रमिता हीच वंचना
जन्मठेप बंदिवास, झुंज दे मना
अहंकार ना शोभे सोस यातना
गौरव ही कर्तृत्वे, मानी तू मना ॥ २ ॥

तटस्थपणे पाहिली ही झुंज मनी मना
तळमळुनी कळवळुनी सोशी यातना
" व्यर्थ हेची जीवन हे " हीच वल्गना
मंथनीचा मेरुदंड घुसळी ताक ना ॥ ३ ॥

कर्तव्ये हेच परी आत्मघात ना
संपवुनी टाक जीवा मरण यातना
सावरकर आकर्षित, संभ्रमी मना
चिंतित ते, विरघळुनी, मोह हो मना ॥ ४ ॥

विवेकशस्त्र वीजेपरी झळकले मनी
विच्छिन्न करी, पळवी अभ्र, साथ देऊनी
आक्रंदन थांबवुनी भोग साहिला
सावरले सावरकर ध्येयवादी ना ! ॥ ५ ॥

राष्ट्रप्रेम उज्ज्वल ते उच्च ध्येय ना !
विवेकबले विजय मिळवी भव्य रे मना ! ॥ ६ ॥

अंदमानात असताना सावरकरांना मातेसमान पूज्य असलेली थोरली भावजय येसूवहिनी यांची फार फार आठवण यायची. प्रचंड वादळच सोसलं बिचारीनं. त्यांची वहिनी धैर्यशील होती. जीवनातील वादळात स्वतंत्रतेचे पाठ शिकविण्यासाठीच उभी होती. सावरकरांनी बरीच पत्रे धाडली तिला. त्यातून मातेसमान असणाऱ्या वहिनीबद्दलचा आदरभावच व्यक्त होत आहे. तिची भेट व्हावी अशी तळमळ सावरकरांना लागली होती पण पुनर्भेटीचा योग नव्हता. राष्ट्राच्या कार्यात आणखी एक समीधा समर्पण झाली असेच सावरकरांना वाटले. सतीचे वाण घेऊन आलेली वहिनी अहेवपणी निघून गेली. ती साक्षात् लक्ष्मीच होती. ती गेल्यावर सावरकरांचे पोलादासारखे कणखर असलेले हृदयही थरथरले. ते वहिनीला उद्देशून म्हणतात –

'स्वर्गीचा हा कल्पवृक्ष कुणी, मम दारी लाविला'. ऐका तर हे गीत.

## स्वर्गीचा हा कल्पवृक्ष

स्वर्गीचा हा कल्पवृक्ष कुणी, मम दारी लाविला ॥ धृ ॥
छायेखाली जीवन घडले
मानुनी पुत्र तू मजला जपले
राष्ट्र प्रेमा स्फुरणही चढले
स्फूर्ती देई, माय माऊली, वहिनी माझी मला ॥ १ ॥

धीराची ही माझी वहिनी
वादळात ही ताठ राहुनी
हसते गाली, नियती पाहुनी
जीवन वादळ, स्वतंत्रतेचे शिकवी पाठ मला ॥ २ ॥

अंकी लोळे तृणांकुर ते
शिडकाव्याने प्रसन्न होते
ईर्षा मोठी, जीवन घडते
माय माऊली, सानुल्यांची, धन्य असे प्रेमला ॥ ३ ॥

यज्ञकुंडी आत्मसमर्पण
वनवासे साहता तळमळे मन
आशीष देई कर उंचावून
आकाशी ती नजर खिळली – देव तिचा पावला ॥ ४ ॥

स्वार्थत्यागी ध्येयलक्ष्मी
काळवंडले वर आकाशी
उरी शाखा कवटाळूनी घे
भकास मन हे, भयाण जीवन, प्रकाश काळोखला ॥ ५ ॥

वाण सतीचे घेई वहिनी
अहेवपणी हे मरण येऊनी
सार्थक होई वीर रमणी
तत्त्ववेत्ती, जीवन उजळी, समिधा हो निश्चला ॥ ६ ॥

माझी वहिनी माय माऊली
उणीव नाही जीवनी पडली
तेजस्वी ती लक्ष्मी आली
पुनर्भेट ना, गेली निघुनी, पहाड थरथरला ॥ ७ ॥

सावरकरांचे कार्य केवढे अगाध होते. कितीही वर्णन केले तरी ते शब्दातीत आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाला सागरच म्हटलं पाहिजे. इतकी उदात्तता, दिव्य भावनांची जोपासना करणारे विनायक दामोदर सावरकर यांनी अस्पृश्यांना जव-

ळीक दिली. पतितपावन मंदिराचे द्वार खुले केले. ‘ हिंदुत्वाचे राष्ट्र असावे ’ या कल्पनेने मानवधर्माची महती पटविणारे, आपल्या अमोघ वाणीने जनमनास आकर्षून घेणारे, उदात्त अन् दिव्य दाहक व्रत घेऊन गर्जून गर्जून मातृभूमी मुक्त करण्यासाठी धडपडणारे सावरकर कसे होते ! त्यांच्या प्रेमाची सीमा किती विशाल होती ते पहा – ‘ हृदय सागरा ’ या गीतातून.

## हृदय सागरा

हृदय सागरा, विनायका किती रत्ने तुज गवसली ?
उघडी कवाडा, समर्पी जीवन मातृ भू भावली ॥ धृ ॥

विशाल सीमा प्रेमाची ती
दिव्य भव्य हे भाव किती
सप्तरंग हे फेसावरती
खळखळ त्यांची किती !
उदात्त दिव्य ते, दाहक व्रत घे, प्रतिज्ञा घेतली ॥ १ ॥

पतित जनांना जवळीक देउनी
देई दिलासा अश्रू टिपुनी
पतित पावन द्वार उघडुनी
आपुलेसे म्हणशी
तोषविलेस तू अस्पृश्यांना सामावुनी घेसी ॥ २ ॥

हिंदुत्वाचे राष्ट्र असावे
मानवतेसी पुजिती भावे
विशालतेचे दर्शन घ्यावे
प्रेमाच्या वर्षावे
गगन कोसळे, सामावून घे, विशाल सागर तळी ॥ ३ ॥

वक्तृत्वाच्या अमोघ लहरी
आदळून ये फेस मुखावरी
गर्जून गर्जून हृदयी स्पर्शुन
आक्रंदुन हसतसे
जागृती दे जनी, उदार पुरुषा, हृदयी पुलकावली ॥ ४ ॥

आकाश म्हणू की तुजला सागर
विशाल उत्कट गूढ वसे
दोघांचीही रूपे उज्ज्वल
हृदयी तेज वसे
सावरकर ते, अमर खरोखरं, नक्षत्रच भूवरी
उधाण ओसरून, शांत पहुडला सागर लहरींवरी ॥ ५ ॥

सर्वांना सामावून घेणारे सावरकरांचे हृदय कसे सागराप्रमाणे विशाल होते पाहिलंत ना !

सावरकरांच्या पत्नीचा – त्यांना माई म्हणत असत – जीवनाचा मार्ग केती काटेरी होता. पंच पतिव्रतांनी त्यांना पूजावे यातच त्यांचा सन्मान आहे. जन्मभर भोग भोगिले. आशेवर दिवस ढळत होते. ऐन तारुण्यात जीवनभर शिशिर व ग्रीष्म ऋतूच उपभोगिले. जानकीमाई वनवासात होती परंतु तिजबरोबर राम होता. या माई एकाकी होत्या. येणाऱ्या आपत्तींना माईंना धैर्याने तोंड द्यावे लागले.

परंतु पतीच्या ध्येयकार्यात सहकार्य देऊन पतिपरायण माई मनातून संतोषल्या होत्या. अखेर बंदिवास भोगून सावरकर घरी परतल्यावर माईंना देवाचे दान मिळाले होते. अहेवपणीच त्यांना मरण आले. असे होते त्यांचे प्राक्तन. ऐका तर गीत – ' पथ हा काटेरी ' ( ' पतिव्रते तव पथ हा काटेरी ' )

## पथ हा काटेरी

पतिव्रते तव पथ हा काटेरी
पंच पतिव्रतांनी नमावे, हाच तुझा सन्मान ॥ धृ ॥

जन्मभरी हे भोग भोगिले
आशेवरती जीवन ढळले
हाती न आले जे वांछियले, निष्ठा हीच महान ॥ १ ॥

वसंतात ही शिशिर पथावरी
उरात घसले काटे जहरी
निष्पर्ण जीवनी पुरी भाळली, हाच खरा अभिमान ॥ २ ॥

वनवासी रामासह जानकी
पतिवियोगे ही एकाकी
दिन ढळला रे, दिन ढळला की, देई रे अवधान ॥ ३ ॥

प्रसन्नता अन् उदासीनता
निसर्गात या साक्ष ही पटता
मृत्युस प्रभाकर कवटाळिता
व्याकुळ अंतरी झुरते माता, सोशी कष्ट महान ॥ ४ ॥

सहधर्मिणी मानी विरहिणी
पतिपरायण तृप्त जीवनी
आकाश कोसळून, ये वादळुनी, असशी तू बलवान ॥ ५ ॥

आनंदाने भरले जीवन
लिहिले विधीने असेच प्राक्तन
अहेवपणी हे मरण येऊन, हे दैवाचे दान ॥ ६ ॥

सावरकर एक युगपुरुष होऊन गेले. त्यांचे ते जीवन पाहून त्यांच्याबद्दल भारतीयांना आत्मीयताच वाटते. एक आदर्श जीवन, स्फूर्तीदायक जीवन.

धन्य ते सावरकर !

आता समारोपाचे अखेरचे गीत सादर करीत आहोत.

भारतात होऊन गेलेल्या थोर क्रांतीकारक वीरांचा जयजयकार आपण आता करूया — ऐका तर गीत —

'बोला जयजयकार वीरांचा, बोला जयजयकार'.

# बोला जयजयकार वीरांचा

## (समारोप)

बोला जयजयकार वीरांचा, बोला जयजयकार ॥ धृ ॥

आज वंदुया बंधुद्वयासी
चाफेकर हे चढले फासी
मातृभूमी ही प्रिय हो त्यासी
निष्ठा त्यांची महान, वंदन करू त्रिवार ॥ १ ॥

धन्य धन्य ही भारत भूमी
भगतसिंह हे राष्ट्रप्रेमी
लाल, पाल अन् बाळ मिळोनी
गौरवगंधे अमर होऊनी
स्फूर्ती दे अनिवार, वंदन करू त्रिवार ॥ २ ॥

स्फूर्ती घेऊनी ऊर्मी उसळे
सावरकर हे तन-मन झटले
चितेत इंधन झाले
तृणवत् तनूला मानी सगळे
वीरही हे आगळे, वंदन करू त्रिवार ॥ ३ ॥

झुंज देऊनी वासुदेव रणी
प्रतिज्ञा घे व्रतस्थ मानी
निज भारती धजला ठेवुनी
दिपश्री दीप महान, वंदन करू त्रिवार
अहा, क्रांती वीर महान ॥ ४ ॥

धन्य असे बलिदान, धन्य असे बलिदान, धन्य असे बलिदान

REFBK-0024105
REFBK-0024105
ग्रंथसंग्रहालय ठाणे
२४९९
कोंक २४१०५
२४११८
शाखा (स्थळ प्रत)